## NEWS PAPER CLIPINGS

Name of Newspaper: Loksatta

Dated : April 10, 2010

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या मदतीचा फेरआढावा घेणार !

मुंबई, ९ एप्रिल / प्रतिनिधी

जी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे राज्य शासनाच्या निकषांवर मदतीस अपात्र ठरली आहेत त्या प्रकरणांचा फेरआढावा घेण्यात येईल, असे महसूल मंत्री नारायण राणे यांनी आज विधान परिषदेत जाहीर केले. शिवसेनेच्या रामदास कदम यांनी या संदर्भातील प्रश्न विचारला होता.



राज्यातील विविध वर्तमानपत्रांमध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरुच असून देशात महाराष्ट्र हे आत्महत्यांबाबत प्रथम क्रमांकाचे राज्य असल्याचे म्हटले जात आहे, याकडे कदम यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांसाठी राज्य सरकार जे नवे ७२६२.६४ कोटींचे पॅकेज तयार करीत आहे हे नक्की काय आहे तसेच नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची अंमलबजावणी सरकार कधी करणार आहे, असे सवाल कदम यांनी विचारले.

यावर महसूल राज्यमंत्री प्रकाश सोळंके म्हणाले की, ७२६२.६४ कोटींचे जे नवे पॅकेज सरकार देणार आहे ते विदर्भातील सहा जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना वेगवेगळ्या पातळीवर मदत करण्यासाठी देण्यात येणार आहे. तसेच जाधव समितीची अंमलबजावणी सुरू असून त्याचा निश्चित कालावधी सांगणे शक्य होणार नाही.

ही चर्चा सुरू असताना काँग्रेसच्या भाई जगताप यांनी वर्तमानपत्रांमध्ये शेतकरी आत्महत्यांची अतिरंजित वृत्ते येत असून त्यामुळे सर्वत्र गैरसमज निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर राणे यांनी सांगितले की, वास्तविक पाहता वर्तमानपत्रांतील बातम्यांवरून सभागृहामध्ये प्रश्न विचारता येत नाहीत. मात्र तरीही शिवसेनेचे काही सदस्य असे प्रश्न विचारतात. यावर काहीशा संतप्त झालेल्या रामदास कदम यांनी लोकशाहीतील चौथ्या स्तंभाची अशा प्रकारे टिंगल टवाळी करणे योग्य नसल्याचे सांगितले. तसेच जाधव समितीच्या सर्वेक्षणानुसार ज्या सहा लाख शेतकरी कुटुंबाची अवस्था कर्जामुळे अत्यंत वाईट झाली आहे त्यांना सरकार महिन्याला २५ किलो धान्य मोफत देणार का, असा सवाल केला. यावर प्रकाश सोळंके म्हणाले की, सरकारी आकडेवारी व वर्तमानपत्रांमधील आकडेवारी यात जवळपास दुपटीचा फरक आहे.

त्यामुळे या सर्व गोष्टी तपासाव्या लागतील. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या नक्की किती व किती आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची कुटुंबे सरकारी मदतीसाठी पात्र ठरली आहेत, याची माहिती यावेळी विरोधी सदस्यांकडून विचारली गेली असता प्रकाश सोळंके यांनी आकडेवारी वाचून दाखवली. त्यावर विरोधी सदस्य संतापले. एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी एक-तृतीयांश शेतकऱ्यांची कुटुंबे सरकारी मदतीसाठी अपात्र ठरविले गेली आहेत, याबाबत विरोधकांनी आक्षेप घेतला. मदतीसाठी पात्र व अपात्र याचे निकष सरकारने सर्व बाबी लक्षात घेऊन ठरविले असल्याचे सोळंके यांनी सांगितले.

मात्र विरोधी पक्षनेते पांडुरंग फुंडकर यांनी इतक्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदतीसाठी अपात्र ठरविणे योग्य नसल्याचे सांगत या अपात्र ठरविलेल्या प्रकरणांची फेरतपासणी करण्याची मागणी केली. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणावर फेरतपासणी शक्य नाही, असे राणे यांनी सांगितले. तेव्हा पंतप्रधान पॅकेज दिल्यानंतर जी कुटुंबे अपात्र ठरविली गेली आहेत त्याची फेरतपासणी व्हावी, अशी मागणी विरोधी पक्षनेत्यांनी केली. यावर राणे यांनी २००८ ते १० या तीन वर्षांतील शेतकरी आत्महत्यांच्या मदत प्रस्तावांची फेरतपासणी केली जाईल, असे स्पष्ट केले.

Name of Newspaper: ...Times of India...

Dated : ...April 2010

FROM SANDWICH PHDS, TWINNING PROGRAMMES AND DUAL DEGREES TO STUDY CENTRES AND PARTNERSHIPS, A RANGE OF PROGRAMMES ARE ON OFFER IN FOREIGN COLLABORATION IN INDIA. WHAT MORE WILL THE FOREIGN EDUCATIONAL INSTITUTION (REGULATION OF ENTRY AND OPERATION) BILL 2010 OFFER TO INDIAN STUDENTS? EDUCATION TIMES FINDS OUT

# 'THE FOREIGN DEGREE IN INDIA WILL BE WORTH NO LESS'



Narendra Jadhav

*Narendra Jadhav, member, Planning Commission, answers frequently asked questions on the foreign university bill*

FAQs

**What does the bill offer to Indian students?**

The bill allows foreign universities and institutes to set up campuses — independently or jointly — in India. Every year, a large number of Indian students go to foreign universities in search of quality foreign education. It will help that section of the student population to receive quality education at a lower cost. Also, for students who do not go abroad, the bill will

presence of foreign education is limited to tie-ups and collaborations. But the foreign universities setting up campuses in India will be offering a full-fledged foreign degree to students.

**What kind of courses will the foreign institutions offer?**

Initially, we are predicting that they will, by and large, offer professional courses, but later we expect them to offer academic qualifications in liberal arts, humanities, and so on.

**How would you ensure that the academic parameters are on a par with institutes overseas?**

means of which the applications will be scrutinised and scanned. Either UGC or National Commission on Higher Education and Research (NCHER) — if it is in place by then — will ensure this. But everything will depend on how we implement this clause to ensure that only quality institutes set up campuses in India. Also, in order to ensure that these institutes are not entirely profit-driven, a clause in the bill will not allow foreign institutes to repatriate the money that they earn in India.

**A foreign education is more than just a degree. It is about the exposure. What are your thoughts vis-à-vis foreign campuses in India?**

of the Harvard campus in India (in case Harvard University decides to set up a campus in India). But we can expect that the foreign degree in India will be worth no less.

Besides, it will be competition for Indian universities. We can look back at how public sector banks improved themselves, once India opened the market to foreign banks. Similarly, while central and state universities may not be affected, private and deemed-to-be universities will need to pull up their socks.

If we want India to become a knowledge economy, it is high time we open our gates to foreign education providers. Once they establish themselves in India,